# अॅम्स्टरडॅम




अॅमस्टरडॅमच्या  शीफॉल एअरपोर्टच्या बाजूने अमित आणि मैत्रेयीचा प्रवास सुरू होता ."हा अॅम्स्टरडॅमचा  शीफॉल एअरपोर्ट.अनेक वर्षांपूर्वी इथे हार्लेम या नावाचा एक विस्तीर्ण तलाव होता. तो तलाव संपूर्ण कोरडा करून  हा प्रचंड एअरपोर्ट बांधण्यात आलेला आहे.आत्ता समुद्रसपाटीच्या चार मीटर खाली आहोत आपण." हन्स ड्रायव्हिंग करत करत माहिती पुरवत होता.  काही वेळातच हायवे सोडून गाडीने उजवीकडचा रस्ता घेतला. आता रस्ते एकदम छोटे दिसायला लागले. रस्त्यांच्या बाजूने छोटे कॅनॉल्सही दिसू लागले. शहराची बांधणी मोठी विशेष होती.

"एका मध्यबिंदु भोवती पसरलेले गोलाकार कालव्यांचे जाळे हे अॅम्स्टरडॅम चे वैशिष्ट्य आहे.अकराव्या बाराव्या शतकापर्यंत एक साधं फिशिंग विलेज असणारं हे गाव. अॅमस्टेल नदीवर बांधण्यात आलेल्या धरणावरुन याचं नाव अॅम्स्टरडॅम असं पडलं.१३ व्या शतका पासूनच अॅम्स्टरडॅमला सिटी राईट्स मिळाले. तशी हॉलंडमधली पुष्कळ शहरं ही चौकोनी बांधणीची आहेत, पण अॅम्स्टरडॅम मात्र गोलाकार बांधलेलं आहे.अमित आणि मैत्रेयी हन्सचं बोलणं ऐकत होते. कॅनॉल्समधली वाहतूक ,त्याच्या बाजूला फूटपाथवरून चालणारी माणसं,,बाजूला सायकल लेनमधून पळणा-या

# ॲम्स्टरडॅम

सायकल्स. लगेच बाजूला वाहनांची रहदारी आणि मधूनच जाणारी शहराची ट्रॅम सर्विस..इतक्या गोष्टी एकाच ठिकाणी पाहून ते थक्क झाले.

पाचेक मिनिटात ते दोघे कॅनाल क्रूझ टर्मिनलला उतरले. ॲम्स्टरडॅमच्या जुन्या कालव्यांमधून ही क्रूज त्यांना फिरवून आणणार होती.क्रूज मधून आजूबाजूचा नजारा न्याहाळताना, त्या विशिष्ट बांधणीच्या इमारती, त्यांच पुढे मागे झुकणं किंवा एकमेकींच्या आधारानी उभं राहणं त्यांना आचंबित करीत होतं. समोरच ॲम्स्टरडॅमचं भव्य रेल्वे स्टेशन होतं.क्रूज डुलत डुलत निघाली.आजूबाजूला सतराव्या शतकातील श्रीमंत व्यापाऱ्यांनी कॅनल्सच्या कडेला बांधलेल्या विलासी आणि सौंदर्यपूर्ण इमारती दिसत होत्या.या जुन्या इमारतींनी शहराच्या सौंदर्यात भर घातली आहे. इथला दाम स्क्वेअर म्हणजे शहरातली सर्व एनर्जी इथेच एकवटली आहे की काय, असा भास व्हावा. ह्या चौकात रॉयल पॅलेस,मॅडम तुसोदच वॅक्स म्युझियम,नॅशनल मॉन्युमेंट अशी काही महत्त्वाची स्थळं आहेत. ॲम्स्टरडॅम हे सायकल्सचं शहर म्हणून ओळखलं जातं, त्यामुळे ठिकठिकाणी सायकल्सचे पार्किंग लॉट्स दिसतात. पुष्कळ जुन्या इमारती या जमिनीत ठोकुन बसवलेल्या लाकडी खांबांच्या वर उभ्या असल्यामुळे एकमेकांवर कललेल्या दिसतात.या कॅनल्सच्या वरुन छोटे छोटे पूल टाकले आहेत. अशा पुलाखालून क्रूझ जाताना मोठी गंमत वाटते-

अनेक रेस्टॉरंट,पब्ज , कॉफी हाऊसेस,हॉटेल्स यांचीही रेलचेल असणाऱ्या ॲम्स्टरडॅम या शहरात वातावरण अतिशय मोकळं असतं. त्यातली पुष्कळ रेस्टॉरंट्स आणि पब्ज 24तास चालू असतात त्यामुळे ॲम्स्टरडॅम मधे सहाजिकच सतत गर्दी असते..त्यातून संगीत व कलांना मिळणारे उत्तेजन, कुठलीही बंधनं नसणारी स्वैर जीवनशैली तसंच इथलं सुप्रसिद्ध नाईट लाईफ इत्यादी गोष्टींमुळे ॲम्स्टरडॅम जगभरातून येणाऱ्या लोकांचे आणि पर्यटकांचे आकर्षण ठरले आहे.ॲम्स्टरडॅमच्या या वैशिष्ट्यांमुळे तिला युरोप मधली 'मोस्ट ओपन माइंडेड आणि लिबरल सिटी 'मानतात. साधारण तासभराची क्रुझ कधी संपली हे अमित आणि मैत्रेयीला समजलंच नाही..हॉलंडच्या वातावरणाची आणि स्वच्छंदी स्वभावाची भुरळ पडते ती अशी. त्याबद्दल पुढच्या भागात........................... क्रमश :